ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# बदलत्या जगासाठी जीवन कौशल्ये शिक्षण

**अमोल पांडुरंग मोहिते**
सौ.निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, जि.पुणे

**प्रस्तावना**

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत. भारत देश महासत्ताक होण्याच्या मार्गावर आहे. जिकडे तिकडे नवीन ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान यामध्ये दिवसेंदिवस भर पडत आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवाने थक्क करायला लावणारी प्रगती साधली आहे. परंतु आपण ज्यावेळी या आपल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याचा प्रयत्न करत असतो त्यावेळी खऱ्या अर्थाने शिक्षणाची गुणवत्ता काय आहे याचा विचार केला तर त्यामध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण झालेली आहे हे आपल्या लक्षात येते. भारतीय शिक्षण पद्धतीसमोर सध्या अनेक समस्या आहेत. विशेषतः जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे शिक्षणाची मूल्ये, गुणवत्ता व समर्पकता यांचे पुनश्चबोधन होणे सद्यस्थितीत महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणाबरोबरच कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची गतिमानता वाढली आहे. त्यामुळे नवनवीन ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांमध्ये जीवनोपयोगी कौशल्ये निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ नुसार पाठयपुस्तक मम्डळाने कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमावर भर दिलेला आहे.

**२१ व्या शतकातील शिक्षण**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे आणि प्रचंड स्पर्धेचे आहे. भविष्यकाळातील कौशल्य पायाभरणी शिक्षणानेच होते. त्यासाठी शिक्षणात निरंतर विकसित होणारे ज्ञान आणि कौशल्ये यांचा मोठया प्रमाणात प्रसार केला पाहिजे.

**युनोस्को अहवाल**

शिक्षणातून प्रत्येकाने आपल्या ज्ञानाच्या, कौशल्याच्या अणि वृत्तीच्या कक्षा रूंदवण्यासाठी सज्ज असले पाहिजे. बदलत्या जगात समायोजन साधण्यासाठी तसेच आयुष्यात येणाऱ्या संधीचा लाभ घेण्यासाठी तयार असलेच पाहिजे. याचाच विचार करून युनोस्को अहवालात शिक्षणाच्या चार मुलभूत आधारस्तंभांचा विचार मांडला आहे.

**१.ज्ञानासाठी शिकणे**

ज्ञान/अवगत गोष्टी मिळविण्यासाठी शिकणे.

**२.कृतीसाठी शिकणे**

ज्ञानाचे जीवनात उपयोजन करण्यासाठी विविध कौशल्यांचा विकास करणे. सभोवतालच्या वातावरणात सर्जनशीलतेने वावरणे.

**३.सहजीवनासाठी शिकणे**

सर्व मानवी व्यवहारात सहभागी होण्यासाठी आणि इतरांना मदत करण्यासाठी शिकणे.

**४.अस्तित्त्वासाठी शिकणे**

वरील सर्वांमध्ये आवश्यक प्रगती साधण्यासाठी शिकणे. (Delors, J., 1996, P.g.85-86)

वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्राचा जबाबदार नागरिक, नवनिर्माता आणि द्रष्टा या सर्व बाजूंनी विकास होणे हे शिक्षणाचे ध्येय आहे. हे ध्येय्यच शिक्षणाच्या चार आधारस्तंभांचा प्रमुख आधार आहे. म्हणूनच अस्तित्त्वासाठी शिकणे या शिक्षणाच्या आधारस्तंभाचा अर्थ मानव बनण्यास शिकणे असा घेतला आहे. ज्ञान, कौशल्य, वृत्ती, मूल्ये यांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास साधताना बुद्धिमत्ता, नैतिकता, सांस्कृतिकता आणि शारीरिक अंगाने मानव चारही आधारस्तंभांच्या दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी विविध गुणांचा विकास अपेक्षित आहे.

उदा.स्मृती, कार्यकारण संबंध, सौंदर्यदृष्टी, शारीरिक क्षमता, संप्रेषण कौशल्य, सामाजिका कौशल्य, न्यायबुद्धी, निष्ठा, जबाबदारी इ.

व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिक्षणाच्या चारही आधारस्तंभांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. सध्याच्या काळात शिक्षण संस्थांकडून समाजाच्या असणाऱ्या अपेक्षांमध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे. आजची युवा पिढी शास्त्रीय, तांत्रिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आघाडयांवर होणाऱ्या सततच्या बदलामुळे एका नवीन जगाचा भाग बनत आहे. सद्यस्थितीतील शालेय शिक्षण हे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक मानून उदयास येत आहे.

विद्यार्थ्यांना नवनवीन आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम करण्यात शालेय शिक्षणाचा महत्त्वाचा वाटा असला पाहिजे. परंतु सद्यस्थितीत बौद्धिक विकासाला नको तितके महत्त्व दिले जात असून भावनिक आणि क्रियात्मक विकासाकडे दुर्लक्ष केले जात आहे. या विकासाचा विचार जीवन कौशल्य शिक्षणात अभिप्रेत आहे.

जीवन कौशल्य शिक्षण हे मानवी क्षमतांवर प्रभाव टाकत असल्यामुळे शिक्षणाचे चार आधारस्तंभ हे त्याचा आराखडा म्हणून वापरात येऊ शकतात.

**राष्ट्रीय ज्ञान आयोग**

ही जीवा कौशल्ये साध्य होण्यासाठी शिक्षणातून मोठया प्रमाणावर प्रयत्न व्हायला पाहिजेत. भारताचे तेजस्वी, गतिमान अशा ज्ञानाधिष्ठित समाजात रूपांतर करणे हे व्यापक ध्येय राष्ट्रीय ज्ञान आयोगाने निश्चित केले. १३ जून २००५ रोजी राष्ट्रीय ज्ञान आयोगाची स्थापना करून डॉ.मनमोहन सिंग यांनी २१ व्या शतकाला सामोरे जाण्यासाठी शिक्षण क्षेत्रात उत्तमता, संशोधन आणि आपल्या क्षमतांची बांधणी यांची आवश्यकता नमूद केली आहे. (www.knowledge commissin.gov.in)

**जीवन कौशल्य शिक्षण**


**संकल्पना**

'जीवन कौशल्य शिक्षणाचा आशय जागातिक आरोग्य संघटना (WHO) १९९९ मध्ये यासंदर्भात असे म्हटले आहे की, 'Life skill Education is designed to facilitate the practice and reinforcement of Psychological Skill in a culturally and developmentally appropriate way; it contraries to the promotion of personal and social development the prevention of health and social problems and the protection of human right.' – WHO – 1999

जागातिक आरोग्य संघटनेने (WHO) जीवन कौशलांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

"जीवन कौशल्य म्हणजे दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध समस्या व गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी व्यक्तीने स्वतःच्या वर्तनात स्विकारात्मक तसेच सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता होय."

जागतिक आरोग्य संघटनेने दिलेली जीवन कौशल्यांची यादी पुढीलप्रमाणे आहे.




**बदलत्या जगासाठी जीवन कौशल्य शिक्षणाची गरज**

सध्याचे युग प्रचंड स्पर्धेचे, धकाधकीचे आणि संघर्षमय आहे. चंगळवादामुळे नितीमूल्यांचा ऱ्हास होतो आहे. विविध स्तरांवरील स्पर्धे मुळे समाजातील लहान मोठया प्रत्येक व्यक्तीला अपरिहार्यपणे संघर्षाला आणि ताण-तणावाला तोंड दयावे लागते. बदलती सामाजिक मूल्ये, विभक्त कुटुंब पद्धती, एक किंवा दोन मुले आणि त्यांच्याकडून पालकांच्या वाढत्या अपेक्षांचे ओझे, तुलना करणारे पालक पालकत्त्वाच्या शिक्षणाचा अभाव त्यामुळे मुलांच्या मानसिकतेबाबत बालकांचे अज्ञान, गैरसमज निर्माण होतो. याचा परिणाम भावी पिढीवर सखोलपणे होतो. त्यातून व्यक्तिमत्त्व न्यूनगंड, भीती, चिंता, नैराश्य येते.

व्यक्तीमध्ये वाढत जाणारी हिंसक प्रवृत्ती, व्यसनाधिनता, नकारात्मक विचार, आत्महत्या, आत्मविश्वासाच्या सर्व गोष्टी टाळण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना जीवन कौशल्यांचे शिक्षण देणे गरजेचे आहे.

**बदलत्या जगासाठी जीवन कौशल्य शिक्षणाचे फायदे**

**१. परिपूर्ण व्यक्तिविकास**

सकारात्मक जीवन जगण्यासाठी तसेच वैयक्तिक विकास कामाला प्राधान्य, प्रोत्साहन देण्यासाठी आत्मभान, आत्मसन्मान आणिअ आत्मविश्वास यांच्या सहाय्याने व्यक्ती स्वतःचे सामर्थ्य आणि कमतरता समजावून घेऊ शकते. आयुष्यातील संधी ओळखून धोक्यांना सामोरे जाण्याची तयारी करू शकते

**२. आतरव्यक्तिगत कौशल्यातून समूह विकास**

जीवन कौशल्य अंगी बाळगल्याने व्यक्तिगत, कौटुंबिक आणि सामाजिक जाणीवेचा विकास होतो. आंतरव्यक्तिगत कौशल्यामुळे व्यक्ती स्वतःच्या जीवनात, कुटुंबात आणि समाजात निर्माण होणाऱ्या समस्या ओळखून त्यांना यशस्वीपणे सामोरी जाऊ शकते.

**३. सामाजिक विकास**

जीवान कौशल्यांच्या सहाय्याने सामाजिक प्रश्न सोडविताना व्यक्ति विविध पर्यायांचा अणि फायदया तोटयांचा विचार करते. या सर्वा ंचा परिणाम म्हणजे चांगले आंतरव्यक्तिात संबंध निर्माण होऊन सामाजिक विकास साधण्यास मदत होते. त्यामुळे सकारात्मक नातेसंबंध निर्माण होऊन सामूहात गटाबरोबर कार्य करण्यासाठी खुप फायदेशीर ठरतात. शिक्षकांना शिक्षण व्यवहार करताना ही कौशल्ये खुपच उपयुक्त आहेत.

**४. पर्यावरणीय कौशल्यांचा विकास**

जागतिकीकरणामुळे नवे तंत्रज्ञान आणि नवी जीवन शैली स्विकारली गेली. त्यामुळे पर्यावरणाचा विनाश होत आहे. मुलांना पर्यावरण व त्याचे रक्षण याविषयी जीवन कौशल्ये संवेदनशील बनवितात. मानवी अस्तित्त्वासाठी, वाढीसाठी आणि विकासासाठी तसेच पर्यावरणीय अरिष्टाला सामोरे जाण्यासाठी आणि मानवी जीवनाशी जुळवून घेण्यासाठी जीवन कौशल्ये मार्गदर्शन करतात.

**५. सामाजिक आरोग्याचा विकास**

जीवन कौशल्यातून अशा की ठराविक आरोग्य आणि सकारात्मक कौशल्यांचा समावेश होतो की, त्यामुळे मुलांना व्यसनांपासून व इतर धोक्यांपासून वाचण्याची प्रेरणा मिळते. अभ्यासक्रमातून वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय विकास साधण्यासाठी जीवनकौशल्ये उपयुक्त ठरतात.

**समारोप**

जीवन कौशल्य शिक्षणाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने व्यक्ती विकास साधला जाऊ शकतो.

जीवन जगण्यची खरी कला अवगत करण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षण अत्यावश्यक आहे. जग जसजसे बदलत चालले आहे. त्याप्रमाणात व्यक्ती आपल्या वर्तनात सकारात्मक बदल करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे परिस्थितीशी समायोजन करण्याची क्षमता विकसित होऊन योग्य निर्णय क्षमता विकसित होण्यासाठी जीवन कौशल्य शिक्षणाची आवश्यकता आहे. आंतरव्यक्ती संबंध विकसित होण्यासाठी प्रभावी संप्रेषणाचा वापर करता यावा. तसेच भावनांचे व ताण तणावाचे व्यवस्थापन करता यावे आणि आलेल्या समस्यांचे उचित निराकरण करण्यासाठी बदलत्या जगासाठी जीवन कौशल्ये आवश्यक आहेत.

**संदर्भ**

१.जीवन कौशल्ये शिक्षण शिक्षक मार्गदर्शिका ः अध्ययन अध्यापन पद्धती आणि मूल्यमापन, भाग दुसरा, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०.

२.भोसले र.अ., डोण उ.म. (२००९) शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, फडके प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.५५.

३.मोरे के.आर. (एप्रिल-जुलै - २००८) शिक्षण समिक्षा, पिंपळापुरे अँड कं.प्रकाशन, नागपूर.

४.गणित पाठयपुस्तक (२००८) इयत्ता आठवी, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यास संशोधन मंडळ.

**Internet**

1.www.rgniyd.com.

2.www.knowledge commission.gov.in

3.www.WHO.in